कायम विनाअनुदान तत्वावर/
विनाअनुदान तत्वावर ... ) ४१३१३३

जाक्रमा.प्राशि-१/खाप्रा.II/मा./पुति/२० ०५
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 17 FEB 2005

आवक क्र:- 3198 .....
24/2/05
दिनांक :-

प्रति
१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

विषय : सन २०० ४ २०० ५ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी माध्यमिक शाळेस परवानगी देणेबाबत. (माध्यम इंग्रजी )

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/ १००४ (२६० २००४)/प्राशि-१, दिनांक २२/६/२००४

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संमाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००४ पासून इ. १ ली च्या वर्गास ---- फक्त सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे. कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १] | विद्या प्रतिष्ठान विद्यानगरी बारामती, पुणे कायम विना अनुदान | विद्यानगरी बारामती. | १ ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह

VSL/1004(260
2004)Pri.Edn-

PRINCIPAL
Vidya Pratishthan's
NEW ENGLISH MEDIUM SCHOOL
Vidyanagari, Baramati - 413 133